# विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर
## जूने सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर-४४०००१

दुरध्वनी क्रमांक ०७१२-२५४२५१८, २५३२०४५, इमेल-Divcom.nc@gmail.com फॅक्स-२५३२०४३

---

क्र. मशा-७(५)/नै.आ.व्य./अ.का./कावि-२०३ /२०१६ दि. ५ सप्टेंबर,२०१७

---

प्रति,

राष्ट्रीय सुचना विज्ञान अधिकारी
(NIC)
नागपूर / चंद्रपूर / वर्धा / गोंदिया / भंडारा / गडचिरोली

**विषय :- मा.विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दीपत्रक देण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर या पदाची जाहिरात व अर्जाचा नमुना यासोबत पाठविण्यात येत असून सदर जाहिरात विभागीय आयुक्त, नागपूर तसेच जिल्हाधिकारी, नागपूर यांचे संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी.

सहपत्र:- वरप्रमाणे.

अनूप कुमार
आयुक्त
नागपूर विभाग नागपूरकरिता

## विभागीय आयुक्त कार्यालय, जूने सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर

क्र. मशा-७(५)/नै.आ.व्य./अ.का./कावि-203/२०१६ दि. 5 सप्टेंबर,२०१७

### विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक, या पदाकरीता जाहिरात.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. आव्यप्र-२०१७/प्र.क्र.३३/आव्यप्र-१ दि. ३१.५.२०१७ अन्वये महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम (MDRM) यासाठी विभागीय स्तरावर, विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक (Divisional Disaster Management Co-ordinator) म्हणून हे पद ११ महिन्याच्या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता शासनाने मान्यता दिलेली आहे. करीता इच्छूक उमदेवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे. सदर पदाकरीता संपूर्ण तपशिल खालीलप्रमाणे आहेत. जाहिरात व अर्जाचा नमूना www.nagpur.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पदाचे नांव | :- | विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक |
| २. | पदाचे कामाचे स्वरुप | :- | महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे |
| ३. | पदाचे प्रमुख उद्दिष्टे | :- | १. विभागीय पातळीवरील नैसर्गिक आपत्ती संबंधित सर्व कामकाजाबाबत कार्यवाही व समन्वय.<br>२. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी व महसूल व इतर प्रशासकीय यंत्रणा यांचेशी नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने समन्वय व अनुषंगिक कार्यवाही करणे. जिल्हा, विभागीय आपत्ती व्यवस्थापन पूर्वतयारी आराखडा (SOP) तयार करणे. |
| ४. | पदासाठी ठोक वेतन | :- | रु. ३०,०००/- प्रती महिना असेल, या व्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय नाही. |
| ५. | शैक्षणिक अर्हता | :- | मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी/पदव्युत्तर पदवी आवश्यक आहे.<br>(सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन) |
| ६. | अनुभव | :- | १. आपत्ती व्यवस्थापनातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>२.मराठी व इंग्रजी भाषांचे चांगले ज्ञान असणे इष्ट.<br>३. संगणकावर टिप्पणी लेखन, अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य. |
| ७. | अर्ज सादर करण्याचे ठिकाण | :- | "नियंत्रण कक्ष" विभागीय आयुक्त कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर |

वरील अर्हता व अनुभवधारक इच्छुक उमेदवारानी दिनांक १२ सप्टें., २०१७ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत आपला अर्ज, अर्हता व अनुभवाचे साक्षांकित प्रमाणपत्र व मूळ प्रतीसह उपस्थित राहून "नियंत्रण कक्ष" विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर जुने सचिवालय इमारत, सिव्हील लाईल, नागपूर येथे अर्ज सादर करावे.

दिनांक १२ सप्टें.,२०१७ रोजी विहीत कालावधीत व वेळेत प्राप्त झालेल्या अर्जाच्या छाननीनंतर दुपारी ३.०० वा. पात्र उमेदवारांच्या नावाची यादी कार्यालयाचे सुचना फलकावर लावण्यात येईल.

प्रत्यक्ष मुलाखती दि. १२ सप्टें., २०१७ रोजी दुपारी ३.३० वाजेपासून विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर येथे घेण्यात येतील. पात्र उमेदवार निवडीचे सर्वाधिकार मा. आयुक्त यांना राहतील.

यासंबंधीच्या सर्व सुचना/माहिती संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सुचनाफलकावर लावण्यात येईल. याबाबत कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

अनूप कुमार

(अनूप कुमार)
विभागीय आयुक्त
नागपूर विभाग, नागपूर

# विभागीय आयुक्त कार्यालय, जूने सचिवालय इमारत, जिल्हापरिषद कार्यालयाजवळ, सिव्हील लाईन, नागपूर

## -विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक, या पदाकरीता अर्जाचा नमुना-

**(अर्ज सादर करावयाचा दिनांक १२ सप्टेंबर, २०१६ सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० पर्यंत)**

१. अर्जदाराचे पूर्ण नाव -

२. अर्जदाराची जन्मतारीख -

३. अर्जदाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता -

४. संपर्काकरीता दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक/ ईमेल आयडी असल्यास -

५ शैक्षणिक अर्हता (पदवी/पदव्युत्तर) बाबत माहिती (टक्केवारीसह). -

६ संगणक परिक्षा पास असल्यास त्याची माहिती प्रमाणपत्राचे साक्षांकित प्रतीसह -

७ आपत्ती व्यवस्थापन विषयक कामाचा प्रत्यक्ष अनुभव आहे काय? -

८ इतर शासकीय कामाचा अनुभव आहे काय? -

९ अवगत असलेल्या भाषा -

**अर्जदाराची स्वाक्षरी/-**
**(पूर्ण नाव)**

**टिप** – अर्जदाराने वरील अर्ज मराठीमध्ये टाईप करुन तसेच आवश्यक प्रमाणपत्राचे साक्षांकित प्रतीसह विभागीय आयुक्त कार्यालयातील नियंत्रण कक्षात दि. १२.९.२०१७ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० पर्यंतच सादर करावा.